# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३८७-२२** **दिनांक २०/१२/२०२२**

## कर्ज काढून देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्या आरोपीतास अटक- नवघर पोलीस ठाण्याची कामगिरी.

नवघर पोलीस ठाणे हद्दिमध्ये राहणारे फिर्यादी नामे जयेश जगजिवनदास मेहता, वय ५६ वर्षे, धंदा-व्यवसाय,रा. श्री शुभलक्ष्मी बिल्डींग, रुम नं-२०१, शिवसेना गल्ली, जनता नगर रोड, भाईदर (पश्चिम), जि. ठाणे यांना दिनांक ०९/११/२०२२ रोजी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर एका अऩोळखी इसमाचा फोन आला व मी एल ॲन्ड टी फायनान्स मधुन बोलत आहे, तुम्हाला फायनान्सची आवश्यकता आहे का? अशी विचारणा केली. फिर्यादी यांना फायनान्सची आवश्यकता असल्याने त्यांनी त्या इसमास होकार दिला. त्यानंतर फोनवरील अनोळखी इसमाने फिर्यादी यांच्या ऑफिसमध्ये येवुन लोन मंजुरी करिता फिर्यादी यांच्याकडुन त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, बॅंक स्टेटमेंट व ३०० रुपये रक्कमचे एल ॲन्ड टि फायनान्स व हिरा हे नांव टाकुन चार क्रॉस धनादेश घेतले होते. दिनांक १०/११/२०२२ रोजी फिर्यादी यांना त्यांच्या फोनवर त्यांच्या बॅंक खात्यामधून १,४८,५००/ रुपये इतकी रक्कम डेबिट झाल्याचा मेसेज आला. त्यावेळी फिर्यादी यांनी बॅंकेत जावुन शाहनिशा केली असता फिर्यादी यांनी त्या अनोळखी इसमास लोनकरिता दिलेले एल अन्ड टी फायनान्स व हिरो ह्या नावाने ३०० रुपये किं.चे क्रॉस धनादेश हे कश्याच्यातरी सहाय्याने खोडुन त्या धनादेशाव्दारे बॅंकेमधुन १,४८,५००/ रुपये इतकी रक्कम रोख काढली असल्याची माहिती मिळाली. सदर घटनेबाबत नवघर पोलीस ठाणे येथे । गुरनं । ९४०/२०२२ भा.द.वि कलम ४२०, ४०६, ४६८, ४६९, ४७१, १२० (ब) प्रमाणे दिनांक ०७/१२/२०२२ रोजी दोन अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हा फसवणुकीचा गंभीर स्वरुपाचा असल्याने गुन्हयाच्या तपासात पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ०१, सहा.पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांनी गुन्ह्याच्या तपासाबाबत सुचना दिल्या होत्या. नमुद गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपीची गुन्हा करण्याचे पध्दतीवरुन मुंबई, ठाणे इत्यादी परिसरात माहिती घेवुन आरोपीताचा शोध घेत असतांना नमुद गुन्ह्या करणारा आरोपी नामे जिगर धिरजलाल कारेलिया, वय ३८ वर्षे, धंदा-लोन एजंट, पत्ता- रुम नं ई ०१ शिवशक्ती चाळ, गुजराती चाळीच्या बाजुला, खोडीयार मंदीराजवळ, पेनरकर पाडा, काशिमीरा, मिरा भाईंदर ता. जि. ठाणे याने केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी यास सदर गुन्हयात दिनांक १३/१२/२०२२ रोजी अटक

करण्यात आली आहे. अटक आरोपी याचे ताब्यातुन एकुण ६५,०००/ रुपये इतकी रोख रक्कम व फिर्यादी यांचे बॅकेचे चेक बनावटीकरण करण्याकरिता वापरलेला इरेजर पेन तसेच फिर्यादी यांचे लोनकरिता घेतलेले डॉक्युमेंट इत्यादी मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच अटक आरोपी हा अश्या प्रकारची फसवणुक करण्यात सराईत असुन त्याने या व्यतिरीक्त अनेक लोकांची फसवणुक केली असुन त्याबाबतचा पुढील तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. श्री शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/सुशीलकुमार शिंदे (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजीत लांडे, पोहवा/भुषण पाटील, पोहवा/गणेश जावळे, पोहवा/नवनाथ घुगे, पोहवा/सुरेश चव्हाण, पोशि/सुरज घुनावत, पोशि/ओंमकार यादव व पोशि/विनोद जाधव यांनी केलेली आहे.

---ooo---